Shivaji College Hingoli Dist. Hingoli

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

CURRENT GLOBAL REVIEWER

March 2020 Special Issue – 28, Vol. 3

## Relevance of Mahatma Gandhi in Today's World

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
*Guide*
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Editor**
Dr. Balasaheb S. Kshirsagar
Director, Gandhian Studies Centre
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
Dr. Dhale S.U.
Dept. of Political Science,
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
Dr. Hurgule N.R.
Dept. of Sociology,
Shivaji College, Hingoli (MS)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

SPECIAL ISSUE – 28 Vol. 3

Title of the issue :

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

## SHAURYA PUBLICATION

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 300/-

**PRINTED BY**
Shaurya Offset
Old MIDC , kalamb Road, Latur

EDITION :
**March 2020**

PRICE : 300 /-

या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन व पुनप्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN-2319-8648
Impact Factor - (SJIF) - 7.139 | Special Issue -28, Vol. 3 | March 2020 | Peer Reviewerd

# Index

1. महात्मा गांधी ह्यांचे आदर्श राज्याविषयक विचार — 1
निरजकुमार देवमनराव अंभोरे

2. महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य : एक अध्ययन — 5
प्रा. किशन मिराशे

3. महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार — 7
प्रा.डॉ.श्रीमती कुरुडे सुनीता शंकरराव

4. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील महात्मा गांधीजींच्या भूमिकेचे मूल्यांकन — 10
प्रो.डॉ.शारदा गोविंदराव बंडे

5. महात्मा गांधी आणि अहिंसा — 12
प्रा.डॉ.श्रीहरी रंगनाथराव पितळे

6. महात्मा गांधीजींचा सत्य आणि अहिंसेचा संदेश — 14
प्रा.बालासाहेब गोविंदराव कानडे

7. महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण — 16
प्रा.डॉ.सुखनंदन उत्तमराव ढाले , रुपाली वसंतराव देशमुख

8. महात्मा गांधीजींचा राष्ट्रवाद — 18
डॉ.हनुमान अंबादास मुसळे

9. गांधी : एक असामान्य नेतृत्व — 20
प्रा.डॉ.जी.एस.पाटील

10. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास — 24
डॉ.कृष्णा मालकर , शिवाजी काशिनाथ गायकवाड

11. महात्मा गांधीचे शिक्षणविषयक विचार — 27
डॉ.सुनील जयसिंग कवडे

12. गांधी-जीना राजकिय प्रवास : यश — 31
डॉ. प्रविण नादरे

13. साहित्यातील साहित्यिकांची भूमिका : — 38
डॉ. अशोक ऊ. घोळवे

14. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास — 40
डॉ. शिंदे माणिक पंडीतराव

15. महात्मा गांधी यांचे स्वराज्य व अहिंसे विषयी विचार — 42
प्रा. सचिन जयस्वाल,

16. वर्तमानकाळात म.गांधीव लालबहाद्दुर शास्त्री यांच्या तत्वज्ञानाचा प्रतिशोध — 44
डॉ.कदम व्यंकट काशिनाथ

17. महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार — 46
प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28 , Vol. 3
March 2020
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

Shivaji College Hingoli

# महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण

प्रा.डॉ.सुखनंदन उत्तमराव ढाले
एम.ए.(राज्यशास्त्र), सेट, पीएच.डी
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय,हिंगोली.

रुपाली वसंतराव देशमुख
संशोधक विद्यार्थी
एम.ए.(राज्यशास्त्र), सेट, नेट
श्री.शिवाजी महाविद्यालय,परभणी

प्रस्तावना

पूर्वीपासूनच भारतात महिला सशक्तीकरनासाठी ते आतापर्यंत म्हणजेच विसाव्या शतकापर्यंत प्रयत्न केले जात आहेत पण तरीही अद्याप उपेक्षा होत असताना दिसत आहे. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत छेडलेल्या आंदोलनापासूनच स्त्रीरूपी स-शक्तिकरणावर जोर दिला परंतु आज स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जातो. महात्मा गांधींच्या मतानुसार आपल्या समाजात सगळ्यात जास्त उपेक्षित ही स्त्रीच आहे आणि त्यामुळे अधपतन होत आहे. स्त्री-पुरुष यांच्यात केवळ नैसर्गिक फरक आहे आणि याशिवाय दुसरा कोणताही फरक नाही.

गांधीजींनी स्त्रियांना स्वातंत्र्य लढ्यात उतरवले आणि त्यांना समान हक्क, अधिकार व स्वातंत्र्य देऊन त्यांचा समाजात दर्जा उंच असे स्पष्ट केले. आपल्याला असे समाजात वातावरण तयार करणे आवश्यक आहे ज्यामुळे ती घरातील कामासारखेच सार्वजनिक कार्य पाडू शकेल.

महिला सबलीकरण हा प्रश्न पूर्ण विश्वातील बुध्दिवादी, समाज सुधारकांनपुढील व नेत्यांपुढील एक महत्वाचा आहे, पण सबलीकरण म्हणजे काय? आणि ते कशे प्राप्त केले जाऊ शकते? केवळ आर्थिक दृष्ट्याच सबळ होऊन उपयोगाच नाही तर आर्थिक बरोबरच राजकीय, सामाजिक ,शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात ती सशक्त होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये महात्मा गांधीजींच्या स्त्री सबलीकरण या विचाराचा आढावा घेण्यात आला आहे. स्त्री सबलीकरण या विचाराची आजच्या काळात कशी गरज आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. महात्मा गांधी यांचे स्त्री सबलीकरणासंबंधीचे विचार केवळ आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सबलीकरण सुद्धा अभिप्रेत आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे

१. महात्मा गांधी यांचे केवळ स्त्री विषयी विचारांचा अभ्यास करणे.
२. आजच्या स्थितीत महिला सबलीकरणाच्या संदर्भात महात्मा गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करणे.
3. स्त्री सबलीकरणाची जगासाठी गरज स्पष्ट करणे.

गृहीतके:

१. महात्मा गांधीनी स्त्री सबलीकरण प्रश्नासंदर्भात विचार केला आहे.
२. आजच्या स्थितीत स्त्री सबलीकरणांच्या विचारांची आवश्यकता आहे.

तथ्य संकलन:

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीय स्त्रोतांचा तथ्य संकलनासाठी आधार घेतलेला आहे. त्यासाठी पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे आधार घेतलेला आहे.

महात्मा गांधी स्त्री सबलीकरण:

महात्मा गांधीजिंचा स्त्री सबलीकरण करण्यासाठी स्त्रीशक्तीवर खूप विश्वास होता. स्त्रीला 'अबला' म्हणणे म्हणजे त्यांचा अपमान करणे होय असे त्यांना वाटत असे. पुरुष्यांनी स्त्रियांचे शोषण केले नसते तर स्त्री सगळ्या जगाला स्वताःच्या अनंत शक्ती दाखवू शकली असती असे गांधीजींना वाटत होते. कौटुंबिक जबाबदारी स्त्री जश्या पद्धतीने समर्थपणे पेलते तशीच सार्वजनिक जीवनात सुध्दा कर्तुत्व दाखवू शकते याची गांधीजींना जाणीव होती. गांधीजींना स्त्रीयांमधील सुप्त शक्तीची जाणीव सर्वप्रथम दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्यावेळी झाली. १९२० नंतर भारत देशात गांधी युगाची सुरवात झाल्यावर गांधीजींनी अनेक स्त्रियांना सार्वजनिक कार्यात सहभागी करून घेतले.

भारत देशात स्त्रियांच्या सबलीकरणाचा विचार गांधीजींच्या पूर्वीच रुजला होता, परंतु गांधीजींनी केवळ स्त्री सबलीकरणासाठी विचार न थांबता स्त्रियांना पुरुष्यांच्या बरोबरीनेच समान वागणूक देण्याचा प्रयत्न केला. स्त्रिया राष्ट्राच्या नागरिक असल्यामुळे त्यांनाही पुरुषांच्या बरोबर स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेतले पाहिजे अशी गांधीजींची भूमिका होती. भारत देशात गांधीजींनी आंदोलन सुरु केल्या नंतर कस्तुरबा गांधी, दुर्गाबेन देसाई, मनिसेन पारेख, अवंतिकाबाई गोखले यांनी पुरुष्यांच्या बरोबरीने काम केले यामधून स्त्री हि अबला आहे हा भ्रम दूर झाला त्या स्त्रियांच्या समान राजकीय हक्कांच्या मागणीला नैतिक अधिष्ठान मिळाले. यासर्व कार्याच्या संदर्भात स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे सांगतात "माझ्या इतक्या वर्षाच्या प्रयत्नांनी जेवढी स्त्रियांमध्ये जागृती झालेली नाही तेवढी गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहामुळे झाली."

महात्मा गांधीजींना स्त्रियांच्या समस्यांची जाणीव होती. स्त्रियांचे राजकारणात भाग घेण्याचे प्रमाण कमी आहे. ज्या स्त्रिया भाग घेतात स्वतः स्वतंत्रपणे विचार न करता वडील, पती जसे सांगतात तसे वर्तन करतात. गांधीजी म्हणतात कि, स्त्रियांनी स्वतंत्र विचार करणे आवश्यक स्त्रियांनी स्वतःला पुरुष्यांपेक्षा कमी समजणे चुकीचे आहे. त्यामुळे गांधीजी म्हणतात, जी स्त्रियांवर अनिष्ठ बंधने आहेत त्याविरुद्ध मी बंड करण्याचा आग्रह करतो.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

Special Issue 28 Vol. 3
March 2020
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

स्त्री सबलीकरणाचे गांधीजी समर्थन करत असताना ते स्त्री स्वातंत्र्याचेसुद्धा समर्थन करतात. स्त्रीला स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व असते तिला सुध्दा पुरुषांइतकेच निसर्गाकडून मानसिक शक्तीची देणगी मिळालेली आहे. तिलाही पुरुषांइतकेच अधिकार असले पाहिजे. स्त्रियांनी स्वत: विषयी न्युनगंडाची भावना सोडून देऊन कुटुंब, समाज जात आपले स्थान मिळवण्यासाठी पुढे आले पाहिजे असे गांधीजी म्हणतात.

गांधीजी स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देण्याचे मान्य करतात. भारतीय कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांची स्थिती गुलामाप्रमाणे होती. त्यांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. स्त्रिया ह्या स्वातंत्र्याच्या लायक नाही अशी समाजात धारणा घट्ट मूळ धरून बसली होती. गांधीजीना भारतीय संस्कृतीचा आदर होता पण ज्यावेळी ह्या परंपरा स्त्री हिताच्या आड येत त्यावेळी मात्र गांधी शास्त्र पेक्षा स्त्री स्वातंत्र्याचे समर्थन करीत. त्यामुळे गांधी कायद्याने मिळणारे हक्क स्त्रीला मिळणे आवश्यक मानतात. त्यांनासुद्धा संपत्तीचा, शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे. कौटुंबिक बाबतीत सुध्दा स्त्रियांना स्वनिर्णयाचा अधिकार आवश्यक मानतात. पती प्रमाणेच पत्नीलाही स्वातंत्र्याची आवश्यकता गांधीजी मान्य करतात.

स्त्रियांना आपले अधिकार उपभोगता यावेत, त्याचे रक्षण करता यावेत यासाठी स्त्रियांमध्ये जागृती निर्माण होण्याची गरज आहे. शिक्षणामुळेच स्त्रीयांमध्ये जागृती निर्माण होऊ शकते यासाठी गांधीजी स्त्री शिक्षणाची आवश्यकता सांगतात.

गांधीजींच्या काळात स्त्री आधोगातीस असण्यास कारणीभूत असलेल्या बालविवाह, हुंडापद्धती यासारख्या प्रथांना ते विरोध करतात, स्त्री सबलीकरणासाठी विधवा विवाह व आंतरजातीय विवाहास ते समर्थन करतात. या अनिष्ठ प्रथात बदल करण्यासाठी कायद्याचा आधार घेणे आवश्यक आहे पण सामाजिक परिवर्तन केवळ शिक्षणाद्वारेच होऊ शकते असे गांधीजी मानत.

गांधीजींच्या स्त्री सबलीकरणाच्या विचारांची दखल अनेक अभ्यासकांनी घेतली जसे कि, मधु किश्वर आणि सुजाता पाटील यांनी इकॉनॉमिक ॲन्ड पॉलीटीकल विकली' या नियतकालिकात १९८१-८२ साली द फेमिनिज्म ऑफ महात्मा गांधी असा लेख लिहून गांधीजींच्या स्त्री सबलीकरणाची मागणी केली.

स्त्रियांच्या शोशनास आर्थिक, सामाजिक, जातीय, लैंगिक आणि पुरुषकेंद्रित राजकारणात अशी अनेकविध परिमाणे आहेत याची गांधीजीना जान होती त्यामुळेच स्त्रियांना वैयक्तिक जीवनापासून ते सार्वजनिक जीवनात उत्कर्षासाठी सतत पुरुषांशी भांडण करावं लागेल पण त्याचबरोबर पुरुष्यांच्या मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे असे गांधीजी म्हणतात.

स्त्री परिस्थितीत बदल होण्यासाठी पुरुष्यांनी वैवाहिक जीवनात आपल्या पत्नीशी स्वामित्वाचे नाते न सांगता मैत्रीचे सहचरणाचे नाते सांगावे. घरकाम मुलांचे संगोपन हि एवढी स्त्रीची समजली गेलेली कामे पुरुष्यांनेही तिच्या बरोबरीने करावीत. स्त्रीला भोग वस्तू न समजता ब्राम्हचार्याचे पालन करावे. गांधीजी स्त्रियांचे खाजगी व सार्वजनिक जीवन अशी विभागणी नाकारून स्त्रीला पुरुष्यांपासून पूर्णत: अभय मिळाले पाहिजे अशी भूमिका घेतात.

स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने गांधीजी ब्रम्हचर्य आवश्यक मानतात. ब्रम्हचर्य म्हणजे कामवासनेचे विवेकशील सय्यम, असे गांधीजी सांगतात, म्हणूनच गांधीजी सय्यम जागा करणाऱ्या कामशिक्षणाचा अंतर्भाव आपल्या शिक्षण क्रमात केला पाहिजे असा निर्वाळा देतात.

स्त्री दास्याची सुरुवात उत्पादन प्रक्रियेपासून ती तुटल्यामुळे झाली होती असे गांधीजी मानतात. स्त्रीला उत्पादन प्रक्रीयेशी जोडल्याशिवाय तिचे आर्थिक परावलंबन जाणार नाही हे गांधीजीनी ओळखले होते. त्यामुळे गांधीजी स्त्रियांच्या हाती तिच्या संपूर्ण नियंत्रणाखाली असलेले चरखा हे साधन देतात. चरखा आणि तत्सम उद्योगात स्त्रियांना प्रवेश देऊन गांधीजीनी त्यांचे आर्थिक सबलीकरण केले.

## सारांश:

पुरुषकेंद्रित समाज रचनेत पुरुष्यांनाही धर्मव्यवस्था, वैधानिक व्यवस्था, अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्थेच्याही आधाराने कार्यरत होत असल्यामुळे या चारही क्षेत्रात स्त्रीचे दास्य व दुय्यमत्व कायम राहाते हे गांधीजींचे निरीक्षण होते आणि म्हणून या चारही आधारावर स्त्रीमुक्त झाल्याशिवाय स्त्री सबलीकरण शक्य नाही हि गांधीजींची धारणा होती. स्त्री सबळ होणे म्हणजे केवळ पुरुष्यांचे अंधनुकरण करणे नव्हे तर व्यक्ती म्हणून आत्मभान येणे आवश्यक आहे असे गांधीजी मानतात.

## संदर्भ:

१) यशवंत सुमंत, गांधी विचारश्रुष्टी काही अलक्षित पैलु, साधना प्रकाशान-२०१६.
२) नलिनी पंडित, गांधी, ग्रंथालय प्रकाशान, मुंबई, जानेवारी-२००६.
३) नारायणभाई देसाई, नारी, गांधी तत्वज्ञान मंदिर, धुळे, ऑक्टोम्बर-२००६.
४) रंगराव दिवाकर, गांधीजींचा त्रिविध संदेश, गांधी स्मारक निधी प्रकाशान, पुणे-१९४४.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner